ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २० | पुणें, बुधवार तारीख २४ नोव्हेंबर, १९५४ | अंक ४१

## विविध माहिती

**मोटारींच्या नवीन प्रकारच्या टायर्स**—अमेरिकन केमिकल सोसायटीचे अध्यक्ष, डॉक्टर फिशर, ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं येत्या तीन-चार वर्षांत १,००,००० मैल चालू शकणारे आणि पंक्चर होण्यास अतिशय कठीण अशा प्रकारचे मोटारींचे टायर्स तयार होतील.

**पिस्टन रिंगजचा कारखाना**—पतिआळापासून जवळ असलेल्या बहादूरगड ह्या गांवीं मोटारींच्या एंजिनाला लागणाऱ्या पिस्टन रिंगजचा कारखाना काढण्यांत येत आहे. हा कारखाना पुढील वर्षाच्या सुरुवातीला उत्पादन करूं लागेल. दिल्लीमधील एका कंपनीनें जर्मन कारखान्याच्या मदतीनें हा कारखाना काढला आहे. कारखान्याच्या भांडवलांत जर्मन कंपनीचें भांडवल २ लाख रुपयांपेक्षा अधिक असतां कामा नये, अशी अट भारत सरकारनें घातली आहे.

**एक हजार वर्षांपूर्वींचीं भूर्जपत्रें**—कलकत्ता येथें जैनांतर्फे भरविण्यांत आलेल्या एका प्रदर्शनांत १,००० वर्षांपूर्वींच्या भूर्जपत्रांच्या नकला मांडण्यांत आल्या आहेत. सुमारें २,४०० भूर्जपत्रांवरून ह्या नकला करण्यांत आल्या असून त्यांत १,७२,००० श्लोक आहेत. 'भूवलय' नामक एका जुन्या ग्रंथासंबंधीची बरीच माहितीहि नकलांत दिली आहे.

**राजस्थानमधील पाटबंधाऱ्यांची योजना**— राजस्थान सरकारनें बोर्डा येथें पाटबंधाऱ्याची योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेच्या बांधकामाला २,७४,००० रुपये खर्च येणार आहे. चितोड रेल्वे स्टेशनपासून दहा मैलांवर असलेल्या एका तळ्याला बांध घालून २,००० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा करण्याची ही योजना आहे.

**पंचवार्षिक योजनेविषयीं प्रचार-सप्ताह**—पुढील महिन्याच्या १२ तारखेपासून १९ तारखेपर्यंत मध्य-भारतांत पंचवार्षिक योजनेविषयीं प्रचार-सप्ताह पाळण्यांत येणार आहे. योजनेची झालेली प्रगति आणि पुढील कार्य ह्यासंबंधीं ठिकठिकाणीं प्रदर्शनें भरविण्यांत येणार आहेत. त्याशिवाय शैक्षणिक चित्रपट दाखविणें आणि नाट्यप्रयोग करणें, असाहि कार्यक्रम ठेवण्यांत आला आहे.

**लँकेशायरमधील गिरण्यांवर संकट**—भारतामधून ब्रिटनमध्यें आयात करण्यांत आलेल्या स्वस्त कापडामुळें लँकेशायरमधील गिरण्यांना संकटांना तोंड द्यावें लागत आहे असें, समजतें. दरवर्षीं सुमारें २० कोटी वार स्वस्त कापड भारताकडून मागवून आणि त्यावर संस्करण करून तें ब्रिटिश बनावटीचें म्हणून विकलें जातें. ह्या स्पर्धेमुळें लँकेशायरमधील गिरण्यांना आपलें कापड चढाओढीच्या किंमतींना विकावें लागतें व फायदा फारच कमी रहातो.

**रेल्वेजना एंजिनांचा पुरवठा**—चालू वर्षाच्या ऑगस्ट अखेर भारतीय रेल्वेजना १३४ नवीन एंजिनें मिळालीं. त्यांपैकीं ९१ भारतांत बनविलेली होतीं. चालू आर्थिक वर्षांत दर पांच दिवसाला ६ रेल्वे एंजिनें, ह्या गतीनें एंजिनांचा पुरवठा करण्यांत येणार आहे.

**हॅन नदीवरील पूल**—चीनमधील हॅन नदीवर ९८४ फूट लांबीचा एक पूल नुकताच पुरा करण्यांत आला. यँगत्से नदीवर पूल बांधून चीनचे दोन रेल्वेमार्ग जोडण्याच्या योजनेंतील हा एक पूल आहे. तो बांधण्यास एक वर्ष लागलें.

**निर्वासितांची सोय करण्यासाठीं**—हिंदुस्थानच्या पूर्वभागांतील निर्वासितांची व्यवस्था करण्यासाठीं भारतीय सरकारनें आणखी १९ लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्या रकमेपैकीं ५ लाख रुपये निर्वासितांना औद्योगिक शिक्षण देण्यासाठीं खर्च करण्यांत यावयाचे आहेत. पैकीं ४,४०,००० रुपये बंगालमध्यें खर्च होतील. उरलेल्या रकमेची वांटणी आसाम, बिहार, उत्तर प्रदेश ओरिसा व त्रिपुरा ह्या राज्यांत व्हावयाची आहे.

**अलाहाबाद येथें मुद्रणकलेची शाळा**—ऑल-इंडिआ फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्स ह्या संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलची बैठक अलाहाबाद येथें दोन दिवस चालली होती. उत्तर हिंदुस्थानासाठीं स्थापन करावयाच्या मुद्रणकलेच्या शाळेसाठीं अलाहाबादची निवड करण्यांत यावी, असा ठराव करण्यांत आला. कांहीं प्रकाशकांनीं उत्तर प्रदेश सरकारच्या, शालेय पुस्तकें स्वतःच छापण्याच्या धोरणाविरुद्ध टीका केली.

**न्यूझीलंडला दारूबंदी नको**—न्यूझीलंडमध्यें दारूबंदी संबंधीं लोकमत अजमावण्यांत आलें असतां पुढीलप्रमाणें मतें पडलीं. सध्यां चालू असलेली व्यापारी परवान्यांची पद्धत चालू ठेवण्यासाठीं ४,९४,५०६ मतें अनकूल पडलीं. संपूर्ण दारूबंदीला अनुकूल १,८६,४१५ मतें पडलीं आणि दारूवर राज्य-सरकारनें नियंत्रण ठेवण्यासाठीं १,२०,०५८ मतें अनकूल पडलीं.

**हिंदी फिल्म्सचा धंदा**—भारतांतील सिनेमागृहांत दरसाल ६० कोटी तिकिटें खपतात. ३,५०० सिनेमागृहें आहेत व त्यांत दाखविण्यासाठीं ६५ स्टुडिओंत ३०० निर्माते दरसाल सरासरीनें २३३ चित्रपट तयार करतात. सिनेमाच्या धंद्यांत ४२ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे व त्याचें ठोक उत्पन्न २५ कोटी रुपये येतें. ह्या धंद्यावर १ लक्ष लोकांची उपजीविका चालते.

**सरकारी नोकरींतील स्त्री-अधिकारी**—इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसमध्यें ७, फॉरिन सर्व्हिसमध्यें ५ व सेंट्रल सेक्रिटारिएट सर्व्हिसमध्यें १० अशा एकूण २२ स्त्रिया भारताच्या उच्च अधिकाराच्या जागीं आहेत.

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

### १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लाख |
| रिझर्व व फंडस् | ५¼ लाख |
| ठेवी व इतर | १ कोटी |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ½ |
| सेव्हिंग ... ... | रु. १½ |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २ |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३ |
| ३ वर्ष मुदत ... | रु. ४ |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली — चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले, कोल्हापूर — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. — मॅनेजर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणं सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २४ नोव्हेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## विदेशी फर्म्समधील नोकऱ्यांचें हिंदीकरण

भारतांत व्यापार व उद्योग करणाऱ्या बऱ्याच विदेशी फर्म्स आहेत. त्यांतील हिंदी अधिकाऱ्यांची बढती थांबविण्यांत येत आहे आणि विदेशी अधिकाऱ्यांचा भरणा वाढविण्यांत येत आहे, अशा तक्रारी भारत सरकारच्या कानावर गेल्या; व्यापारांत अधिकाधिक विदेशी फर्म्स लक्ष घालूं लागल्या असल्यामुळें ही परिस्थिति सरकारला चिंतनीय वाटली. त्यानें जून, १९५२ मध्यें विदेशी फर्म्सकडून त्यांचेकडील ३०० ते ४९९ रु. आणि १,००० रु. वर पगार मिळविणाऱ्या हिंदी व विदेशी अधिकाऱ्यांविषयीं माहिती मागितली. १ जानेवारी, १९४७ रोजीं व त्यानंतर दरसालच्या पहिल्या दिवशीं त्यांचेकडे नोकरीस असणारांचा तपशील त्यांनीं सरकारला सादर करावा, असें सुचविण्यांत आलें. कांहीं विदेशी फर्म्सनीं अर्थातच ह्या बाबतींत सहकार्य केलें नाहीं. तथापि, सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल, कीं हिंदीकरणाची गति वाढविण्याची आवश्यकता बहुतेक विदेशी फर्म्सनीं मान्य केलेली आहे व त्याला अनुसरून प्रगतीहि घडून आलेली आहे.

विदेशी फर्म्समध्यें अधिकाराच्या जागांवर हिंदी लोकांना अधिकाधिक नेमण्यांत यावें, ह्याचीं मुख्यतः दोन कारणें आहेत. भारताची प्रगति व स्थैर्य ह्याबद्दल विदेशी फर्म्सना आस्था असणारच. सुशिक्षित, लायक तरुणांना योग्य वाव मिळाला नाहीं व त्या जागीं विदेशी लोक नेमण्यांत आले, तर त्यामुळें असंतोष निर्माण होण्यास मदत होईल हें उघड आहे. विदेशी फर्म्स भारतांत नकोशा वाटणें त्यांच्या हिताचें होणार नाहीं; म्हणून भारत सरकारचें तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्याचें जें धोरण आहे, त्यास विदेशी फर्म्सनीं मदत करणें युक्तच आहे. दुसरें एक कारण असें, कीं जरूर नसतांना भारी पगाराचे विदेशीय नेमून फर्मचा खर्च वाढतो त्यामुळें सरकारचें कराचें उत्पन्न बुडतें. वरिष्ठ नोकऱ्या एकजात हिंदी लोकांना दिल्याच पाहिजेत, असें सरसकट सांगतां येणार नाहीं.

भारत सरकारच्या व्यापार आणि उद्योगखात्यानें नुकत्याच जाहीर केलेल्या आंकड्यांवरून असें दिसतें, कीं तेल कंपन्यांनीं हिंदीकरणाचे बाबतींत तत्परता दाखविली, पण मळेवाल्यांनीं मात्र सहकार्य केलें नाहीं; उलट त्यांचेकडील युरोपियन अधिकाऱ्यांची संख्या वाढलीच आहे. येत्या पांच वर्षांत हिंदीकरणाची बरीच प्रगति करून दाखवूं, असें मळेवाल्यांनीं आश्वासन दिलें असल्याचें समजतें. १ जानेवारी, १९५४ च्या सर्व फर्म्सच्या एकत्रित आंकड्यांप्रमाणें, ५०० रु. खालील गटांतील ९८·८% नोकर हिंदी आहेत; ५०० ते ९९९ रु. गटांत तें प्रमाण सुमारें ९०% आहे आणि १,००० रु. वरील गटांत तें सुमारें ३०% आहे. सर्वच गटांतील एकूण ( हिंदी + विदेशी ) नोकरांची संख्या वाढलेली आहे.

## विदेशीयांतील ब्रिटिशांची व इतरांची संख्या

विदेशीयांपैकीं ८७% ब्रिटिश आहेत. त्यांची संख्या गेल्या दोन वर्षांत कमी झाली आहे. पण, डच, जर्मन, स्वीडिश, आयरिश व कनेडिअन लोकांच्या संख्येंत वाढ झालेली आढळते. १९४७, १९५२ व १९५४ मधील तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत:—

| नागरिकत्व | १९४७ | १९५२ | १९५४ |
|---|---|---|---|
| ब्रिटिश | ६,९०१ | ७,२१४ | ६,७४७ |
| अमेरिकन | २०१ | २३४ | २३० |
| फ्रेंच | २१ | ३२ | २९ |
| बेल्जियन | ८ | ९ | ९ |
| डच | ४५ | ६० | ६७ |
| स्विस | १४१ | १५९ | १४७ |
| डॅनिश | ४३ | ८१ | ७३ |
| इटालिअन | ११ | ४० | ३५ |
| ऑस्ट्रिअन | ५ | १२ | १० |
| रशिअन | ३ | ० | १ |
| पोर्चुगीज | २ | २ | १ |
| झेक | ८६ | ५८ | २१ |
| नॉर्वेजिअन | ११ | ११ | १४ |
| ग्रीक | १६ | ५१ | ३९ |
| जर्मन | ११ | ४२ | ८६ |
| स्वीडिश | १३ | ३० | ५५ |
| पोलिश | १ | ३ | ० |
| हंगेरिअन | ३ | ४ | २ |
| आयरिश | ७ | ९ | १३ |
| कनेडिअन | २८ | २२ | २६ |
| फिनिश | ८ | ६ | ० |
| ऑस्ट्रेलियन | १४ | १५ | १४ |
| न्यूझीलंडर्स | ५ | ६ | ६ |
| चायनीज | २० | ४४ | ४० |
| इस्राइली | १ | ० | १ |
| सिलोनीज | १ | १ | ३ |
| बर्मीज | २ | १ | ३ |
| पाकिस्तानी | २ | ८५ | ४५ |
| इराणिअन | ४ | ५ | १ |
| फ्रेंच इंडियन | ० | २ | ० |
| गोअन | १ | २ | २ |
| अरब | १ | २ | ३ |
| जपानीज | ० | ० | ७ |
| अर्जेंटिनिअन | ० | ० | २ |
| इतर | ५ | ४ | १४ |
| एकूण... | ७,६२३ | ८,२५२ | ७,७५० |

| | ५०० ते ९९९ रु. | | १००० रु. वर | | ५०० रु. वरील सर्व | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदी | विदेशी | हिंदी | विदेशी | हिंदी | विदेशी | |
| १९४७ | २,२२५ | १,६१६ | ५०४ | ५,८४४ | ६,१६२ | ७,६२३ | १३,७८५ |
| १९५० | ४,२३८ | १,२७९ | १,४०६ | ६,८७१ | ११,८०३ | ८,३१८ | २०,१२१ |
| १९५४ | ७,४९६ | ६५० | ३,३४६ | ७,००८ | १८,६४२ | ७,७५० | २६,३९२ |

वेगवेगळ्या धंद्यांतील, १,००० रु. पगारावरील जागांची तुलना करणें बोधप्रद होईल; कारण त्याच जागा अधिक महत्त्वाच्या आहेत:—

| धंदा | हिंदी | विदेशी |
|---|---|---|
| बँकिंग | ८८ | ३८८ |
| विमा | ८९ | १४३ |
| मोटर | ३१ | ३६ |
| ज्यूट | ६१ | ६०३ |
| मळे | १०४ | १,१२० |
| तेल | ४३६ | ५२७ |

### कार्नेजी इन्स्टिटयूट ऑफ वॉशिंग्टन

### ( जुलै १९५२ ते जून १९५३ चा अहवाल )

दि कार्नेजी इन्स्टिटयूट ऑफ वॉशिंग्टनची स्थापना अॅन्ड्र्यू कार्नेजी ह्यांनीं २८ जानेवारी, १९०२ रोजीं केली. त्यावेळीं कार्नेजीनें १ कोटी डॉलर्स किंमतीचे रोखे विश्वस्त मंडळाच्या स्वाधीन केले. त्यांत कार्नेजीनें १९०७ मध्यें २० लक्ष डॉलर्सची भर घातली आणि पुनः १९११ मध्यें १ कोटी डॉलर्स दिले. संस्थापकाच्या सूचनेप्रमाणें काढण्यांत आलेल्या ३० लक्ष डॉलर्स रिझर्व्ह फंडाचें उत्पन्न खर्चास उपलब्ध असतें, तें वेगळेंच. कार्नेजी कॉर्पोरेशन ऑफ न्यूयॉर्कनें गेल्या कांहीं वर्षांत कार्नेजी इन्स्टिटयूटच्या फंडास १ कोटी डॉलर्स दिले आहेत.

इन्स्टिटयूटची व्यवस्था पहाण्यासाठी २४ ट्रस्टींचें एक मंडळ आहे. ज्ञानांत भर पडत चालली म्हणजे संशोधनाच्या दिशा बदलतात. जें संशोधन नव्यानें महत्त्वाचें झालें असेल, त्याला विशेष चालना देण्याकडे कार्नेजी इन्स्टिटयूटचें लक्ष असतें. कांहीं प्रश्नांचे बाबतींत अनेक संशोधक, विशेष साधनसामुग्री व अखंड प्रयत्न ह्यांचें सहकार्य घडवून आणावें लागतें. इन्स्टिटयूटच्या संशोधनकार्याचा व्यावहारिक उपयोग घडवून कसा आणतां येईल, ह्याकडे संस्थेचें सतत लक्ष असतें.

प्रस्तुत अहवालांत प्रथम कार्नेजी इन्स्टिटयूटच्या अध्यक्षांनीं संशोधनाच्या व संशोधकांच्या बाबतींत इन्स्टिटयूटचे अनुभव नमूद केले आहेत, ते संशोधक व संशोधन संस्था ह्यांना अत्यंत मार्गदर्शक वाटतील. त्यानंतर त्यांनीं वेगवेगळ्या संशोधनखात्यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे. त्यानंतरच्या सर्व, म्हणजे सुमारें ३०० पृष्ठांचा ह्या संशोधनाचा तपशील देण्याकडे विनियोग केलेला आहे.

प्रस्तुत वार्षिक अहवाल लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें, येथें पहावयास मिळेल.


**—आपली पत सुरक्षित करा—**

उद्योगधंद्यामध्यें माल, वाहनें वगैरेंचे विमे तत्परतेनें घेतले जातात. पण ज्या शब्दावर व पतिवर धंद्यांतील सर्व उलाढाल अवलंबून असते ती न कळत असुरक्षित ठेवली जाते त्याची तरतूद आजच करा.

अधिक माहितीकरितां आजच शाखाधिकाऱ्यांना भेटा अगर लिहा.

—फोन नं. ३४०१—

**वेस्टर्न इंडिया विमा कं. लि. सातारा**


पुणें शाखा :— वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मी रस्ता, पुणें २

सर्वांच्या खात्रीचे व विश्वासू

— चष्म्यांचे व्यापारी —

**आर. एन्. शिंदे अँड सन्स्**

मुंबई




: यांचें पुण्यांतील दुकान :

**९२०–२१, सदाशिव लक्ष्मीरोड, पुणें २.**

मुख्य दुकान :—१०७ गिरगांव रोड, मुंबई ४.

—शाखा—

( १ ) चामरबाग रोड, परळ, मुंबई १२.

( २ ) मुकुंद मॅन्शन, न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

**'अर्थ' ग्रन्थमाला**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

४ सहकार

## राष्ट्रीय आर्थिक घडींत ग्रामोद्योगांचें स्थान

( अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग मंडळानें पुणें येथें भरविलेल्या परिषदेचें उद्घाटनप्रसंगीं दि. १७ नोव्हेंबर १९५४ रोजीं राष्ट्रपतींनीं केलेलें भाषण. )

आज आपल्या देशाच्या आर्थिक व्यवस्थेंत घरगुती स्वरूपाच्या धंद्यांस महत्त्वाची कामगिरी बजवावयाची आहे. औद्योगिकरण हीच भौतिक प्रगतीची मुख्य खूण असें मानलें जात असलेल्या आजच्या जगांत घरगुती स्वरूपाच्या उद्योगधंद्यांना स्थानच नाहीं अशी समजूत जनतेच्या मनांत वावरत नसती तर या मुद्यावर भर देणें कदाचित् अनावश्यक म्हणतां आलें असतें. परंतु जनतेच्या मनांतील ही समजूत जितकी गैरसमजाची, तितकीच निराधार आहे असें मला वाटतें. ८० टक्के जनता शेती व इतर तत्सम व्यवसायांवर निर्वाह करीत असलेल्या भारतासारख्या देशांत आत्यंतिक औद्योगिकरणामुळें कमी लोकांकडून अधिक उत्पादन हाच एकमेव परिणाम घडून येईल आणि त्यामुळें बेकारीचा प्रश्न सुटण्याऐवजीं तो अधिक गुंतागुंतीचा व कठीण मात्र होऊन बसेल.

आपल्या देशांत हस्तव्यवसाय आणि फावल्या वेळांत घरच्य घरींच सहज करतां येतील असे छोट्या प्रमाणावरील धंदे यांना विशेष महत्त्व आहे. या वस्तुस्थितीकडे डोळेझांक करून केवळ औद्योगीकरणाद्वारेंच आपण बेकारीचा प्रश्न सोडवूं शकूं अशी कल्पना केली तर आपल्या पदरीं केवळ निराशाच पडल याबद्दल माझी खात्री आहे. बेकारीचा प्रश्न यशस्वीपणें सोडविल्यावांचून आपण दारिद्र्य दूर करूं शकणार नाहीं. कारण, देशांत उपलब्ध असणारी जी कांहीं संपत्ति असेल ती ज्यांना कांहीं तरी काम करावयास मिळालें आहे त्यांच्यामध्येंच वांटतां येईल. म्हणून कामधंदा नसणारे किंवा अंशतः कामधंदा असलेले सर्व हेच मुख्यत्वे दारिद्र्याचे बळी असल्यामुळें ग्रामीण विभागांतील जनतेच्या हिताच्या दृष्टीनें व एकंदरींत आपल्या देशाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें उल्लेख केलेला गैरसमज दूर झाला पाहिजे आणि आपले घरगुती धंदे लोकप्रिय करण्यासाठीं व त्यांच्यांत सुधारणा होण्यासाठीं प्रयत्न केले पाहिजेत.

सरकार मोठमोठ्या उद्योगधंद्यांस कोट्यावधी रुपयांची मदत करीत असून तशी मदत करतां यावी म्हणून जनतेवर करांचें मोठें ओझें सरकारला लादावें लागत आहे. ग्रामोद्योगामुळें लक्षावधी लोकांचा फायदा होऊन अनेकांस त्यामुळें काम मिळत असतां सरकारनें मोठ्या उद्योगधंद्यांप्रमाणें ह्या धंद्यांसहि तेवढ्याच प्रमाणावर साह्य न करण्यास मला कांहींच कारण दिसत नाहीं. एखादी वस्तु मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांत तयार होऊन स्वस्त दरास मिळूं शकत असतां ती लहान प्रमाणावर तयार करणें निरर्थक आहे असें सूचित करण्यांत कांहींच युक्तिवाद नाहीं. कांहीं वस्तू किंचित् जादा किंमत देऊन खरेदी करण्यास आपण कांकूं केल्यास लक्षावधी लोकांत बेकारी वाढेल आणि परिणामीं त्यांवर उपासमारीची पाळी येईल आणि म्हणून एका बाजूस बेकारी व उपासमार आणि दुसऱ्या बाजूस कांहीं वस्तूंची किंचित् जादा किंमत यांतील एक पर्याय आपणांस पत्करावयाचा आहे; आणि जादा किंमत देण्यापेक्षा मोठ्या प्रमाणावरील बेकारी कोणताहि शहाणा मनुष्य पत्करणार नाहीं याची मला खात्री वाटते.

उत्पादनवाढ हेंच आपलें एकमेव ध्येय मानतां कामा नये. लोकांना सुसंपन्न करणें व जास्तींत जास्त लोकांस कामधंदा मिळवून देणें हेंच आपलें खरें उद्दिष्ट असलें पाहिजे. आपल्या देशांतील लक्षावधी लोकांची उपजीविका हस्तव्यवसाय व छोट्या उद्योगधंद्यांवर चालते हें सर्वश्रुत आहे. म्हणून या धंद्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा विकास साधणें हेंच आपलें परमोच्च कर्तव्य होय. अवजड यंत्रसामुग्री बसवून उत्पादनांत वाढ करतां येईल हें मी मान्य करतों, परंतु घरगुती धंद्यांची हानी करून ही उत्पादनवाढ साध्य झाल्यास त्यामुळें जनतेचें हित होण्याऐवजीं हानीच केल्यासारखें होईल. ही गोष्ट सर्वसामान्यतः खरी असल्याचें मान्य करण्यांत आलें असून भारत सरकारनेंहि ती जाणली आहे. म्हणून या बाबतींत आपणांस चिंता बाळगण्याचें कारण नाहीं.

बेकारीनें उग्र स्वरूप धारण केलेल्या आजच्या काळांत, रोजगाराची हमी देणाऱ्या मार्गापेक्षा देशास अधिक लाभदायक दुसरें कांहींच नाहीं. ही श्रद्धा आपणांस आधारभूत वाटावी व बापूजींच्या पवित्र स्मृतीनें आपणांस स्फूर्ति प्राप्त व्हावी. ग्रामोद्योगांस आज कैक शतकें भारतीय जीवनांत महत्त्वपूर्ण स्थान असलें तरी तें लोकांच्या नजरेसमोर आणून आपल्या राष्ट्रीय आर्थिक घडींत त्यांना स्थान प्राप्त करून देण्याचें सारें श्रेय महात्मा गांधीजींकडेच जातें.


सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक
लिमिटेड.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
अधिकृत भांडवल रू. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रू. ७,२७,३००
रिझर्व रू. ६,०६,०००
ठेवी रू. १,२२,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा:- दादर, माहीम, बेळगांव, पुणें.


### माउंट एव्हरेस्टची उंची वाढली !

माउंट एव्हरेस्टची उंची २९,०२८ फूट असल्याचें सर्व्हे ऑफ इंडियानें आतां निश्चित केलें आहे. पूर्वींच्या २९,००२ फुटांपेक्षां ही उंची २६ फुटांनीं जास्त आहे. शिखरावरील बर्फाच्या कमी—जास्तपणामुळें त्याच्या उंचींत १० फुटांचा फरक पडूं शकेल. २९,००२ फूट उंची गेलीं शंभर वर्षे मान्यता पावलेली होती; पण २९,०५०, २९,०८०, २९,१४१ आणि २९,१४९ इतके फूट उंची असल्याचेंहि सांगण्यांत येत असे. म्हणून, निश्चित उंची ठरविण्याचें काम दोन वर्षांपूर्वी हातीं घेण्यांत आलें. जगांतील सर्वांत उंच शिखर चढून गेल्यानंतर, त्याची उंची मोजण्याचें अवघड कामहि आतां पुरें झालें आहे.

### सिगारेट्सच्या उत्पादनांत घट

भारतांत १९५० मध्यें २३६ लक्ष सिगारेट्सचें उत्पादन झालें; १९५१ मध्यें तें २१४ लक्ष सिगारेट्सवर आलें, १९५२ मध्यें तें आणखी खालीं म्हणजे २०१ लक्ष सिगारेट्सपर्यंत पोंचलें आणि १९५३ मधील उत्पादन तर फक्त १९७ लक्ष सिगारेट्स इतकेंच भरलें. सिगारेट्सच्या कारखान्यांची उत्पादन-क्षमता २४२ लक्ष सिगारेट्स, इतकी आहे.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

### दुर्मिळ ग्रंथांचें प्रदर्शन

पुणें येथें कौन्सिल हॉलमध्यें भरलेल्या परिषदेच्या ठिकाणीं महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयानें आपल्या संग्रहीं असलेल्या हिंदुस्थानांतील जगप्रसिद्ध कारागिरी या विषयावरील बहुमोल व व दुर्मिळ अशा ग्रंथांचें प्रदर्शन मांडलें होतें. यांत इंडियन आर्ट जर्नल या नियतकालिकाचे १७ वर्षांचे अंक, सर जॉर्ज वॅट् यांचा दिल्ली येथील प्रदर्शनावरून कलाकौशल्यावरील १९०३ चा मौल्यवान् ग्रंथ आणि डॉ. सी. एम्. बर्डवुड यांनीं १८८० सालीं साऊथ केन्सिंग्टन् संग्रहालयाकरितां हिंदी कलाकौशल्यावरील लिहिलेला ग्रंथ, हे ग्रंथ प्रमुख होते. श्री. आर. के. पाटील व श्री. प्राणलाल कपाडिया यांनीं या ग्रंथांची पाहणी बारकाईनें केली. कलाकौशल्यांच्या पुनरुत्थानांत अशा साहित्याची जरूरी फार आहे व हें वाङ्मय दुर्मिळ आहे, बहुमोल आहे व फार जरूरीचें आहे, असा त्यांनीं अभिप्राय दिला. श्री. भा. वि. घारपुरे यांनीं या व इतर विषयांशीं संलग्न अशा साहित्याची माहिती खादी–ग्रामोद्योग परिषदेसाठीं आलेल्या प्रतिनिधींना दिली. या साहित्याचा उपयोग योजनापूर्वक कशा प्रकारें करावा व हिंदुस्थानच्या सुप्रसिद्ध कारागिरीच्या कामीं त्यांचें उत्पादन, संवर्धन, संगोपन, प्रसिद्धि, शिक्षण व जागृति, इ. बाबतींत काय करावयास येईल याचा विचार समिति करणार आहे. हे ग्रंथ चालू प्रदर्शनांत महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या दालनांत मांडण्यांत आलेले आहेत. औद्योगिक संग्रहालयाजवळ अदमासें दहा हजार रुपये किंमतीचे या विषयावरील ग्रंथ आहेत. याचे बरोबरच कलाकौशल्य संग्रहहि आहे.

### खादीला मध्यवर्ती सरकारचें उत्तेजन

१९५३–५४ मध्यें भारत सरकारनें ३·७५ लक्ष रुपयांची खादी विकत घेतली होती. १ एप्रिल ते ३१ ऑगस्ट १९५४ ह्या पांच महिन्यांतील भारत सरकारची खरेदी १४लक्ष रुपयांची झाली. गिरणीच्या कापडाऐवजीं खादीचा वापर करतां येण्याजोगा असेल, तर खादीस प्राधान्य द्यावें, असें सरकारचें धोरण आहे. मिलच्या कापडाचा एक गणवेष जितके दिवस टिकेल, तेवढ्या मुदतीसाठीं खादीचे दोन गणवेष लागतील असें गृहीत धरण्यांत आलें आहे. सध्यांच्या गणवेषाऐवजीं खादीचे गणवेष देण्यास पोस्ट व तार खात्यास ३१·७ लक्ष रु. जादा लागतील. रेल्वे खात्याचे बाबतींत हा जादा खर्च १ कोटी रुपयांवर जाईल. खादी–उत्पादन केंद्रांस भेटी देऊन शक्य तों सल्ला व सूचना देण्यासाठीं सरकारनें दोन अधिकारी नेमले आहेत.

### रशियाची युनायटेड नेशन्सची वर्गणी

रशियाजवळ परदेशी हुंडणावळ नसेल, तर त्यानें युनायटेड नेशन्सची वर्गणी सोन्याच्या स्वरूपांत द्यावी, असें ग्रेट ब्रिटननें जनरल असेंब्लीच्या अंदाजपत्रक-समितींत सुचविलें. रशियाची वर्गणी एकूण खर्चाच्या १४·५% वरून १५·०८% करण्यास रशियाचा विरोध आहे. युद्धकालीन नासधूस आणि परदेशी हुंडणावळीचा तुटवडा, ह्यांत अमेरिकेच्या स्वार्थी व्यापारी धोरणानें भर घालून रशियाच्या अडचणी वाढविल्या आहेत, असें त्याचें म्हणणें आहे.

### सोलापूर येथील राज्य सहकारी परिषद्

येती ( २५ वी ) मुंबई राज्य सहकारी परिषद् सोलापूर येथें दि. २१ व २२ जानेवारी, १९५५ रोजीं भरविण्यांत येणार आहे. ह्या परिषदेंत कोणत्या विषयांची चर्चा व्हावी, ह्याबद्दल सूचना इन्स्टिट्यूटकडे ८ डिसेंबर, १९५४ पूर्वीं पाठवाव्या.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक स्थापना १९३५

चेअरमनः–श्री. वा. पुं. वर्दे

## अठ्ठावीस शाखांचा विस्तार

नागपूर ते हरिहर व मुंबई ते हैद्राबाद या विस्तृत क्षेत्रांत बँकेच्या अठ्ठावीस शाखा पसरल्या आहेत. त्यापैकीं पुढील ठिकाणीं त्या अलीकडे चालू झाल्या आहेत. तरी जनतेनें या सोयीचा अगत्य फायदा घ्यावा.

१ भवानी पेठ, पुणें. २ जव्हेरी बाजार, मुंबई. ३ पनवेल. ४ भिवंडी. ५ अहमदनगर. ६ श्रीरामपूर.

मुख्य कचेरी व डेक्कन जिमखाना पुणें शाखा येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस.

हेड ऑफिस : थोरले बाजीराव रस्ता.

चिं. वि. जोग
मॅनेजर.



स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |


★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# भारतांतील "वनस्पति" व्यवसाय

लेखक :
श्री. शां. म. डहाणूकर, बी. ई., एस. एम. (यू. एस. ए.), एम. एल. सी.


लेखक

'वनस्पति' म्हणजे खाण्याच्या तेलास तुपासारखें स्निग्ध स्वरूप दिलेला पदार्थ, हीं गोष्ट आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. कोणत्याहि खाण्याच्या तेलांत रसायन क्रियेनें हायड्रोजन गॅस मिळविला कीं, एरव्हीं पातळ दिसणारें तेलाचें स्वरूप बदलून त्यास स्निग्ध रूप येतें. ही क्रिया करतांना अर्थातच शरिरास अपायकारक असे अमांश ( Free fatty acids) तसेंच इतर आरोग्यास अपायकारक घाण–पदार्थ हे काढून त्याचा उग्र वासहि नाहींसा करण्यांत येतो. ह्याशिवाय तेलास अधिक पौष्टिक बनविण्यासाठीं त्यामध्यें शुद्ध निर्भेळ तुपांत असतात इतक्या प्रमाणांत जीवनसत्त्वें ( Vitamins ) मिसळलीं जातात. अशा तऱ्हेनें शुद्ध केलेलें स्निग्ध तेल हें अधिक टिकाऊ, रुचकर व पौष्टिक बनतें. त्यासच 'वनस्पति' म्हणतात.

### सुरुवात व प्रगति

१९३० च्या सुमारास देशांत 'वनस्पति' उत्पादनाला लहान प्रमाणावर सुरवात झाली. आज सुमारें २४-२५ वर्षांनंतर साखरेच्या खालोखाल देशांतील एक प्रमुख धंदा म्हणून या धंद्यानें स्थान पटकाविलें आहे. शिवाय सबंध आशिया खंडांत तेल-शुद्धीकरणाचा इतका मोठा धंदा हिंदुस्थानाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं.

सध्यां देशांत एकूण ४९ 'वनस्पति' कारखाने असून यांमधून सुमारें २ लाख टन 'वनस्पति' दरवर्षीं बनविण्यांत येतें. या धंद्यांत एकूण सुमारें २५ कोटी रुपये भांडवल गुंतलें असून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या सुमारें ७५,००० लोकांना उपजीविकेचें साधन या धंद्यामुळें उपलब्ध झालें आहे. याशिवाय देशभर सुमारें ५०,००० लहान–मोठे व्यापारी व दुकानदार यांना या मालाच्या विक्रीचें कामहि मिळतें. या धंद्याचें असें महत्त्वाचें स्थान जाणूनच पहिल्या पंचवार्षिक योजनेंत या धंद्याचा प्रामुख्यानें समावेश केलेला आहे. तसेंच या धंद्याच्या वाढीकडे व जोपासनेकडे मध्य सरकार खास लक्ष पुरवीत आहे.

### प्रगतीचे चार टप्पे

'वनस्पति' उद्योगधंद्याच्या वाढीचे आतांपर्यंतचे ठोकळमानानें तीन कालखंड झाले व आतां चवथ्यास सुरुवात झाली आहे असें म्हणतां येईल. पहिला कालखंड १९३० ते १९४० चा होय. यामध्यें धंद्यास सुरुवात झाली असली तरी तयार झालेल्या मालाची लोकांस माहिती होणें, त्याचा प्रचार होणें व तो माल वापरांत येणें, इत्यादि सुरुवातीच्या प्रतिस्थापनेच्या आवश्यक कार्यांत गेला. अर्थात् आस्ते आस्ते धंद्याची थोडी थोडी वाढहि होत गेली, आणि १९४० पर्यंत एकूण आठ कारखाने स्थापन झाले. या कारखान्यांची उत्पादनक्षमता सुमारें पाऊण लाख टनांची होती. पण १९४० सालचें प्रत्यक्ष उत्पादन मात्र सुमारें ५०,००० टन इतकेंच झालें. ह्या काळांत या धंद्याचीं पाळेंमुळें सुस्थिर पायावर रोंवलीं गेलीं.

दुसरा कालखंड म्हणजे दुसऱ्या महायुद्धाचा १९४० ते ४६. या युद्धाच्या ऐन धामधुमीच्या काळांत ह्या धंद्याच्या वाढीस खूप उत्तेजन मिळालें. युद्धकाळांतील अडचणी असूनहि १९४० सालीं असलेली आठ कारखान्यांची संख्या झपाट्यानें वाढत जाऊन १९४६ सालापर्यंत देशांत एकूण २१ कारखाने स्थापन झाले आणि वनस्पतीचें प्रत्यक्ष उत्पादनहि ५०,००० टनांवरून १,३०,००० टनांवर गेलें. अशा रीतीनें या धंद्याची भरभराट होऊन त्यास या वेळपावेतों महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें.

युद्धकाळांतील या प्रगतीमुळें आणि त्या वेळीं सर्वत्रच औद्योगीकरणाकडे आकर्षिलेल्या वातावरणांत युद्धोत्तर काळांत आणखी नवे कारखाने काढण्यास लोक पुढें सरसावले. सरकारचेंहि देशांतील औद्योगिक वाढीकडे लक्ष होतेंच व देशामध्यें औद्योगिक वाढ सर्व बाजूंनीं सारखी व्हावी म्हणून त्यांनीं परिस्थित्यनुरूप निरनिराळ्या उद्योगधंद्यांवर नियंत्रणें ठेविलीं. 'वनस्पति' उद्योगधंद्याची वाढहि अशा तऱ्हेनें नियंत्रित करण्यांत आली. तरीहि अशा सरकारी बंधनांना सांभाळून व सरकारी योजनेनुसारच पुढील तीन–चार वर्षांत कारखान्यांची संख्या २१ पासून ४२ याप्रमाणें दुप्पट झाली! १९४७ नंतर १९५३ पर्यंतचा हा तिसरा कालखंड म्हणतां येईल. मात्र या तिसऱ्या कालखंडांत कारखान्यांची वाढ जरी खूप झाली असली तरी प्रत्यक्ष उत्पादनवाढ मात्र बेताचीच झाली हें खालील कोष्टकावरून आढळून येईल.

**हिंदुस्थानांतील 'वनस्पति' कारखान्यांची व 'वनस्पति' उत्पादनाची १९४५ ते १९५३ दरम्यान झालेली वाढ**

| वर्ष | अस्तित्वांत असलेले कारखाने | त्यांची वार्षिक उत्पादनक्षमता ( टन ) | त्यांत झालेलें प्रत्यक्ष उत्पादन ( टन ) |
|---|---|---|---|
| १९४५ | २१ | १,८४,००० | १,३२,००० |
| १९४६ | २२ | १,९०,००० | १,४२,००० |
| १९४७ | २४ | २,००,००० | *९७,००० |
| १९४८ | २६ | २,०९,००० | १,२८,००० |
| १९४९ | ४१ | ३,०२,००० | १,५५,००० |
| १९५० | ४६ | ३,३० ००० | १,७१,००० |
| १९५१ | ४६ | ३,३०,००० | १,७२,००० |
| १९५२ | ४८ | ३,३५,००० | १,५०,००० |
| १९५३ | ४९ | † ३,५०,००० | १,९१,००० |

( * उत्पादन घटण्याचीं कारणें : ( १ ) देशाच्या फाळणीमुळें गेलेली बाजारपेठ, ( २ ) अपूर्व प्रयोगांस मिळालेल्या दुर्दैवी प्रसिद्धीमुळें 'वनस्पति' वापरावर झालेला परिणाम. † अर्धवट बांधलेले असे आणखी ८ कारखाने आहेत. ते सुरू झाल्यावर एकूण उत्पादनक्षमता ४ लाख टन होईल. )

१९५३ सालीं १९४६ च्या मानानें जरी कारखान्यांची वाढ सुमारें अडीचपटीनें झाली असली, तरी उत्पादन वाढ १,३०,००० टनांपासून अवघी १,९०,००० टनांपर्यंत झाली. तसेंच १९५३ सालीं एकूण ४९ कारखान्यांची उत्पादनक्षमता जरी ३ लाख, ५० हजार टनांइतकी होती, तरी प्रत्यक्ष उत्पादन फक्त याच्या ५० ते ५५ टक्केच झालें. अशा रीतीनें कारखान्यांच्या जवळ जवळ निम्म्या उत्पादनशक्तीचा उपयोग केला गेला नाहीं असें दिसून येईल.

'वनस्पति' च्या उत्पादनवाढींतील आतां उरलेली महत्त्वाची अडचण म्हणजे सरकारी करांचा बोजा ही होय. तेलांची किंमत जर एक रुपया रत्तल धरली तर आणखी सुमारें २-२। आण्यांच्या खर्चांत या तेलापासून 'वनस्पती' तयार होतें. पण याच 'वनस्पती' वर ३-३॥ आण्यांइतका करांचा बोजा पडतो. अशा तऱ्हेनें एरव्हीं एक रत्तल तेलापासून बनलेली 'वनस्पती' फार तर १ रु. २॥ आणे रत्तलास विकतां आली असती, तीच आतां रत्तली १ रु. ६ आण्यांपर्यंत विकावी लागते. यावरून करांच्या या बोजांचा किती मोठा भाग गरीब मध्यमवर्गीय जनतेला उचलावा लागतो हें लक्षांत येईल. मी मुद्दामच गरीब व मध्यमवर्गीय जनतेचा उल्लेख केला आहे. कारण शुद्ध व निर्भेळ तूप रत्तली रु. ४ ते ५ प्रमाणें विकलें जात असतांना 'वनस्पती' अवघी १। ते १॥ रु. रत्तलप्रमाणें विकली जात आहे. तिच्या टिकाऊपणा व रुचकरतेमुळें तसेंच या स्वस्त किंमतीमुळें ती मध्यम व गरीब जनतेमध्यें लोकप्रिय झाली आहे. म्हणून या वस्तूंवरील करांचा बोजा मुख्यतः समाजांतील या वर्गावरच पडतो. या सर्व गोष्टींचा विचार केला व 'वनस्पती' उत्पादनवाढीची आवश्यकता लक्षांत घेतली तर 'वनस्पती' वरील करांचा बोजा कमी करणें किती आवश्यक आहे हें निराळें सांगायला नको. असो. तिसऱ्या कालखंडांत निर्माण झालेल्या अडचणी व त्यांतून वाट काढून हा धंदा कायम आणि स्थिर स्वरुपांत स्थापिला गेला. या दृष्टीनें हा कालखंड महत्त्वाचा होय.


५० वर्षांपेक्षां जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


### सद्यःस्थिति

मागील कालखंडांतील अडचणींतून मार्ग काढून या धंद्यानें आतां चवथ्या कालखंडांत प्रवेश केला आहे. यावेळीं उत्पादन-क्षमता आणि प्रत्यक्ष उत्पादन यांमध्यें असलेल्या तफावतीमुळें धंद्यांत चढाओढ व चुरस निर्माण झाली आहे. त्यामुळें 'वनस्पती' च्या मालाची प्रत सुधारून ती अधिक चांगली करणें, खर्चांत बचत करणें, व अशा तऱ्हेनें अधिक चांगला माल, शक्य तितक्या कमी किंमतींत गिऱ्हाइकांस देणें अवश्य झालें आहे. ह्याचा गिऱ्हाइकास तर फायदा मिळेलच पण ह्या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल होण्यास मदत होईल असें वाटतें. ह्याच वेळीं जर सरकारनेंहि करांचा भार हलका केला तर ह्या चवथ्या कालखंडांत 'वनस्पती' उत्पादन झपाट्यानें वाढून देशांतील गरीब व मध्यम वर्गाची एक मोठी गरज भागविली जाईल. —"वैभव"

**फुलपाखरांच्या निर्गतीवर नियंत्रण**—फुलपांखरांच्या निर्गतीस भारत सरकारनें बंदी केली आहे. ह्या बंदीस एक अपवाद आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ वाइल्ड लाइफ, कलकत्ता, ह्यांचा दाखला असेल, तर शास्त्रीय किंवा शैक्षणिक कार्यासाठी किंवा फुलपांखरें जमविण्याचा छंद असणारासाठीं फुलपांखरांच्या निर्यातीस परवानगी दिली जाईल.


सांडू

प्रेग-यूटेरो

गर्भिणी-गर्भ-रक्षक





दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.

चेंबूर-मुंबई.



दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

### दुधाच्या डेअरीची सहकारी संस्था

आनंद येथें खेडा डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह मिल्क प्रोड्यूसर्स युनियन ह्या नांवाची एक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आली आहे. संस्थेच्या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ राष्ट्राध्यक्ष बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांच्या हस्तें नुकताच साजरा झाला. ह्या संस्थेच्या उभारणीसाठीं ४० लाख रुपये खर्च येणार आहे. ही रक्कम निरनिराळ्या ठिकाणाहून गोळा करण्यांत येत आहे. खुद्द संस्था १९ लाख, ४० हजार रुपये उभे करणार आहे. मुंबई सरकार युनिअनला १० लाख रुपयांचें कर्ज देणार आहे. युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंड ह्या निधीकडून ८ लाख रुपये मिळणार आहेत. दुधाच्या डेअरीसाठी लागणारी अद्ययावत् यंत्रसामुग्री न्यूझीलंडचें सरकार पुरविणार आहे. ह्या यंत्रसामुग्रीची किंमत जवळ जवळ २ लाख रुपये आहे. डेअरीची संपूर्ण यंत्रसामुग्री बसविण्यांत आल्यावर निरनिराळ्या दुग्धजन्य पदार्थांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊं लागेल. दररोज ३ लाख पौंड दूध, १० हजार पौंड लोणी व तूप, १२ हजार ५०० पौंड दुधाची भुकटी आणि १२ शें पौंड केसीन ह्या पदार्थांचें शास्त्रीय रीत्या उत्पादन करण्यात येईल. विशेष म्हणजे हे सर्व पदार्थ जंतुविहीन करण्यांत येतील. भारतांत अजूनपर्यंत मुलांना लागणारे दुधाचे पदार्थ, शुद्ध जंतुरहित क्रीम आणि गोठविलेलें दूध तयार होत नाहीं. आनंद येथें नव्यानें निघणाऱ्या ह्या दुग्धालयांत वरील पदार्थ तयार करण्याची सोय प्रथमच होत आहे. भारतामधील दुधाचें उत्पादन आणि त्याचा दरमाणशीं खप आरोग्य रक्षणाच्या दृष्टीनें फार कमी आहे, असें सांगण्यांत येतें अर्थात्, शास्त्रशुद्ध पद्धतीनें चालविण्यांत येणाऱ्या दुग्धालयांची जरूरी उघडच आहे.

---

### उसावरील पट्टीचा विनियोग उसासाठी करा

महाराष्ट्रांतील साखरकारखाने मुंबई सरकारला केन सेसच्या स्वरूपांत दरसाल ६० लक्ष रुपये देतात, परंतु त्यापैकीं २०% रक्कम सुद्धां उंसाबाबत संशोधन आणि उसाचा प्रसार ह्यावर खर्चीं पडत नाहीं, अशी तक्रार कित्येक वर्षें दि डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन करीत आली आहे. त्या तक्रारीचा पुनरुच्चार असोसिएशनचे मावळलेले अध्यक्ष मि. डब्ल्यु. जेंकिन्स (बेलापूर कं. लि.) ह्यांनीं असोसिएशनच्या वार्षिक सभेत केला. सहकारी सोसायट्यांना मदत व कर्जें, पाणीपुरवठ्याच्या किरकोळ योजना, रस्त्यांचें सिमेंट-कॉंक्रीटिंग, इत्यादींवर बाकीचा ८०% केन सेस खर्च होतो. हा खर्च सरकारनें त्याच्या इतर उत्पन्नांतून भागविला पाहिजे आणि उसावरील पट्टीचा विनियोग मूळ उद्देशासाठीच केला पाहिजे, हें सरळ दिसतें. गोदावरी शुगर मिल्स लि. चे श्री. के. जे. सोमया ह्यांची १९५४-५५ सालासाठीं असोसिएशनच्या अध्यक्षपदीं निवड झाली आहे.


---

### दि बेलापूर कं. लि.

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९५४ असेर संपलेल्या वर्षी १,१३,२७,१९३ रुपयांची साखर विकली. ३,७९,९८६ रु. घसारा काढून ४३,७३,६११ रु. नफा मिळविला. मॅनेजिंग एजंटसना ऑफिस अलावन्स व कमिशन मिळून ५,६६,८११ रु. मिळाले. प्रत्येक भागावर १६ रु. करमाफ प्रमाणें डिव्हिडंडला १५,०३,९२० रु. लागतील. अन्नधान्यें लावण्याची आतां सक्ति नसल्यामुळें जमिनीला विश्रांति मिळून उसाचें पीक आणखी सुधारूं शकेल.


# किर्लोस्कर

## 'कल्याण' पॉवर शेंगायंत्र




हें यंत्र चालविण्यास ६/८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.

या शिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. गरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

**किर्लोस्कर बंधु लि.**

**किर्लोस्करवाडी, द. सातारा.**

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ९६,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.




# समृध्दीकडे मार्गक्रमण

लांब व भव्य आगगाडी धड् धड् धक् धक् करीत येते आणि खरं खरं करीत थांबते. उत्सुक आणि आतुर असे खेडूत भोंवती जमतात...... खेडूतांच्या आयुष्यांतील ती एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना असते. कारण खेडयांतील उत्पादन, त्यांच्या श्रमाचें तें फल, त्या आगगाडींतून शहरांत जाणार असतें.

आगामी कालांत, आपल्या खेडयांतील उत्पादन हजारो मैल लांबीच्या आगगाडीच्या मार्गांवरुन व रस्त्यांवरुन शहरांत वाहून नेलें जाईल. पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत ३,००० मैल लांबीचे आगगाडीचे मार्ग पुन्हां बांधले जातील. दळणवळणांच्या कार्यक्षम पद्धतीचा पाया घालण्यासाठीं ७७० मैल लांबीचे नवे कॉंक्रीटचे रस्ते आणि ६६ प्रचंड पूल बांधले जातील. व्यापार, उद्योगधंदे आणि संस्कृति ह्यांच्या ह्या मार्गांवरुन आपली जनता अधिक सुसंपन्न व अधिक परिपूर्ण आयुष्याकडे मार्गक्रमण करील.

लाखो टन पोलाद पंचवार्षिक योजनेंतील विविध कल्पना अमलांत आणण्यासाठीं वापरलें जाईल. आणि म्हणून, आपल्या राष्ट्राच्या व जनतेच्या अधिक सुसंपन्न व अधिक फलदायी भविष्याचा पाया घालण्यांत पोलाद अनेक महत्त्वपूर्ण तऱ्हेने उपयोगास येईल.

**दी टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनी लिमिटेड.**





हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद् वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.